# जाहिर नोटीस

## रत्नागिरी येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, .....

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील अभिलेख कक्षात दरवर्षी नियमानुसार नाश होणा—या फाईल्स वर्गवारीनुसार नाश करणेकरिता तसेच जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील इतर कागद रद्दी नाश करणेकरिता नवीन तंत्रज्ञानाची इलेक्ट्रोनिक पेपर कटींग मशीन दि. २३/०२/२०१८ चे आदेशान्वये खरेदी करणेत आलेली आहे. सदरहू पेपर कटींग मशीन सुस्थितीत राहणेकरिता सदरहू मशीनचा वार्षिक देखभाल करार करणे आवश्यक असल्याने याद्वारे दरपत्रके मागविणेत येत आहेत.

तरी ज्या कोणा व्यक्ती अगर संस्थेस वर नमुद केलेप्रमाणे जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील अभिलेख कक्षातील इलेक्ट्रोनिक पेपर कटींग मशीनचा वार्षिक देखभाल करार करणे शक्य असेल, त्यांनी आपले दरपत्रक खालील अटी व शर्तीस अधिन राहून हि नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासुन आठ दिवसांचे आत म्हणजेच १४/०३/२०२४ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून दयाव्यात.

## दरपत्रकाबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे. दरपत्रकात GST कमांक नमूद असावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत जोडावी

२. पेपर कटींग मशीनबाबत तक्रार दिलेनंतर त्वरीत या न्यायालयात हजर होवून तक्रारीचे निवारण करावयाचे आहे अथवा संबंधित मशीनकरिता आवश्यक कंझ्युमेबल पार्टची त्वरित माहिती कार्यालयाला देणेची आहे.

३. जर एखाद्या तक्रारीचे निवारण आपण दिलेल्या अटी व शर्तीच्या कालावधीत झाले नाही तर दुस—या सर्व्हीस प्रोव्हायडरला सदरची झेरॉक्स मशीन दुरुस्तीसाठी कळविले जाईल व त्यासाठी येणारा खर्च हा आपल्या देखभाल खर्चामधून वजा केला जाईल.

४. तक्रार निवारण करणेसाठी प्रशिक्षीत तज्ञाला पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्याला पेपर कटींग मशीनबाबतचे पुरेसे ज्ञान अवगत असणे आवश्यक आहे.

५. जेव्हा सर्व तक्रारीचे निवारण होईल तेव्हाच वार्षिक देखभालीचा खर्च देणेत येईल. सदरचा खर्च हा कार्यालयासाठी पुरविणेत आलेला निधी जेव्हा उपलब्ध होईल तेव्हा देणेत येईल.

६. जर आपणाशी केलेला वार्षिक देखभाल करार हा समाधानकारक नसेल तर सदर वार्षिक देखभाल करार हा कोणतीही आगावू नोटीस न देता रद्द करणेत येईल.

७. वार्षिक देखभाल कराराचा खर्च हा त्रैमासिक पद्धतीने (Quarterly Basis) अदा करणेत येईल. तसेच देखभालीसाठी आगावू खर्च देण्यात येणार नाही.

८. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दिनांक ०७/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

DISTRICT COURT OF RATNAGIRI
सत्यमेव जयते
डिस्ट्रीक्ट कोर्ट, रत्नागिरी

दिनांक — ०७/०३/२०२४

प्र. प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.

म.जा.क्र. वित्त/९८८२/२०२४
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक:— ०७/०३/२०२४

प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी—

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
२. संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी